Vol. 1, Issue . 1 / February 2011, pp.140-144

Research Paper - History

# सांगली जिल्ह्ययातील कवठे महांकाळ तालुक्यातील प्राचीन शिलालेख

प्रा.भोसले सुधाकर विठ्ठल
कला व विज्ञान महाविद्यालय
आटपाटी

**प्रस्तावना:-**

सांगली जिल्ह्यातील एक अवर्षणग्रस्त तालुका म्हणून कवठेमहांकाळ तालुका ओळखला जातो. कवठेमहांकाळ तालुक्याने स्वातंत्र्योत्तर काळात राजकीय क्षेत्र, कृषी क्षेत्र, शिक्षण क्षेत्र व सांस्कृतिक क्षेत्रामध्येमहत्वाची भूमिका बजावलेली आहे. सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्यातील प्राचीन शिलालेखांचा अभ्यास करीत असताना स्थानिक इतिहासाचे महत्व, सांगली जिल्ह्याची स्थापना, कवठेमहांकाळ तालुक्याची स्थापना, सांगली जिल्ह्यातील प्राचीन शिलालेख, कवठेमहांकाळ तालुक्यातील प्राचीन शिलालेख ,कवठेमहांकाळ तालुक्यातील बोरगांव येथील शिलालेख व कोंगनोळी येथील भगवान महावीर यांच्या चरणाखाली शिलालेख महत्वपुर्ण आहेत.

**स्थानिक इतिहासाचे महत्व:-**

कवठेमहांकाळ तालुक्याचा इतिहास हा स्थानिक इतिहास या संशोधन प्रकारामध्ये मोडतो त्यामुळे स्थानिक इतिहासाचे महत्व लक्षात घेणे आवश्यक बनते. हिंदुस्थानातील विविध प्रांताचे इतिहास इतिहासकारांनी लिहिलेले आहेत. मात्र विशिष्ट प्रांताचे, शहराचे, खेड्याचे व प्रादेशीक घटकाचे इतिहास दुर्लक्षित राहिलेआहेत. त्यामुळे इतिहास लेखनामध्ये स्थानिक इतिहासाला महत्व प्राप्त झालेले आहे. जगभरातून या दृष्टीकोनातून नवीन अभ्यास सुरु झालेला आहे.त्यास New History असे संबोधले जाते.

सन १५९७ मध्ये जॉन स्टोने सर्व प्रथम युरोप मधील एका शहराचा अभ्यास करुन सर्वे ऑफ लंडन हे पुस्तक लिहिले आहे. सन १८९० मध्ये इतिहासकार मेटलॅंड यांनी परगण्याचा इतिहास लिहिण्यास सुरुवात केली आणि हॉस्कीन्स यांच्या मतेशहराच्या इतिहास लेखनाचा पाया मेटलॅंड यांनी घातला. त्यामुळे लोकांना स्थानिक इतिहासाचे महत्व वाटत होते. त्यांच्या स्पष्टीकरणार्थ हॉस्कीन्स पुढील गत मांडतात.

So much of the past invisibly persihing our eyses more and more have been led to take an interest in a particular place and wish to find out all about some shallow brained tharist would doubtdess call this escapism but the fact is that we are not born internationalists and there comes a time when the compexity and size of modern problem leave us cold. We belongs to a particular place and the bigger and more in comprehensible the modern grows the more will people from to study some thing of which they can grasp the scale and in which they can find a personal and individual meaning.

वरील हॉस्कीन्स यांचे मते विचारात घेता भारत देशामध्ये स्थानिक इतिहासाचे महत्व वाढत आहे.

सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्याचा इतिहास हा स्थानिक इतिहासामध्ये मोडतो. कवठे महांकाळ तालुक्याने राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात महत्वाची भुमिका बजावली आहे.

**सांगली जिल्ह्याची निर्मिती**

सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुका हा

एक महत्वाचा तालुका आहे. त्यामुळे सांगली जिल्ह्यातील निर्मिती कशी झाली हे पाहाणेआवश्यक बनते. सन १९४८ पर्यंत सांगली हे दक्षिण महाराष्ट्रातील एक महत्वाचे संस्थान होते. सन १९४९ मध्ये सातारा जिल्ह्यामध्ये सांगली संस्थानातील कांही गावाचा समावेश होता. सन १९४९ मध्येसातारा जिल्ह्याचे दक्षिण सातारा जिल्हा व उत्तर सातारा जिल्हा असे दोन जिल्ह्यात विभाजन झाले. त्यावेळी मिरज व जत संस्थानचा समोवश दक्षिण सातारा जिल्ह्यामध्ये करण्यांत आला. त्यावेळी कवठेमहांकाळ हे गांव मिरज संस्थान मध्ये होते. सन १९६० मध्ये दक्षिण सातारा जिल्ह्याचे विभाजन झाले व महाराष्ट्राच्या नकाशावर नवीन सांगली जिल्ह्याची निर्मिती झाली.[२]

**कवठेमहांकाळ तालुक्याची स्थापना**

कवठेमहांकाळ तालुक्याची भौगोलिक रचना पहाता हा तालुका ७४'' पूर्व अक्षांश व ७५'४५° पूर्व रेखांश व १६'५५° व १७'५५° उत्तर अक्षांशावर वसलेला आहे. कवठेमहांकाळ तालुक्यामध्ये एकूण ६० गावाचा समावेश आहे.[३]

सन १९६० मध्ये सांगली जिल्हा अस्तित्वात आलेला होता. सांगली जिल्ह्यामध्ये जुना सातारा जिल्ह्यातील , तासगांव, खानापूर, वाळवा, शिराळा, या तहसिलचा समावेश होता. कांही कालांतराने जत व मिरज या दोन तहसिलचा समावेश सांगली जिल्ह्यामध्ये करण्यात आला. त्याच वेळी कांही संस्थानचे जिल्ह्यामध्ये मिरज व खानापूर तहसिलाचा समावेश करण्यात आला. सन १९७० मध्ये आटपाटी व कवठेमहांकाळ तहसिलाचा समावेश सांगली जिल्ह्यात करण्यांत आला. त्यामुळे सन १९७० मध्ये सांगली जिल्ह्यामध्ये मिरज, खानापूर, जत, तासगांव, शिराळा, वाळवा, कवठेमहांकाळ व आटपाटी अशा नऊ तालुक्याचा समावेश झाला. त्यामुळे सांगली जिल्ह्याच्या निर्मितीनंतर १९७० मध्ये कवठेमहांकाळ तालुक्याची स्थापना झाली.[४]

**कवठे तालुक्यातील प्राचीन मंदिरे**

संस्कृती ही एका सामुदायाकडून दुसऱ्या सामुदायाकडे संक्रमीत होत असते. मानवी समुदाय हा संस्कृतीचे रक्षण करण्यामध्ये प्रबळ समजला जातो. इतर प्राणीमात्राला संस्कृती असते. पण ते आपली संस्कृती पुढेनेवू शकत नाहीत. मानवी समुदाय हा पूर्व स्मृतीच्या जोरावर आपल्या संस्कृतीचे रक्षण करण्यामध्ये प्रबळ समजला जातो. इतर प्राणीमात्राला संस्कृती असते पण जे आपली संस्कृती पूढे नेवू शकत नाहीत. मानवी समुदाय हा पूर्व स्मृतीच्या जोरावर आपल्या संस्कृतीचे जनत करतो व आपल्या संस्कृतीचा वारसा पुढील पिढीला देतो. प्रत्येक संस्कृतीमुळे मानवी सामुदायामध्ये अमुलाग्र अशी प्रगती झालेली आहे.

सांगली जिल्ह्यातील कवठे महांकाळ तालुक्यातील प्राचीन शिलालेख सांगली जिल्ह्याच्या कवठेमहांकाळ तालुक्यास सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. सांगली जिल्ह्याच्या प्राचीन इतिहासाचा शोध हा शिलालेख , ताम्रपट , विविध मुर्तीच्या चरणाखाली कोरलेले शिलालेख इ. वरुन लागतो. सांगली जिल्ह्यामध्ये जत तालुक्यातील भाळवणी येथे व जत तालुक्यातील उमराणी येथे, मिरज तालुक्यातील कवठे पिरान, खानापूर तालुक्यातील भाळवणी येथे प्राचीन शिलालेख सापडले आहेत. सांगली जिल्ह्यातील वाटेगांव येथे वटेश्वराचे प्राचीन मंदिर व कवठे महांकाळ तालुक्यातील कोंगनोळी येथे भगवान महावीर यांची प्राचीन मुर्ती सापडली आहे. या विविध शिलालेखामधून तत्कालिन प्राचीन राजघराणी, त्यांची राजपध्दती, सामाजिक स्थिती व धार्मिक स्थितीवर प्रकाश पडतो.

**सांगली जिल्ह्यातील प्राचीन शिलालेख**

सांगली जिल्ह्याचा प्राचीन इतिहासाचा शोध प्राचीन शिलालेखामधून लागतो. सागली जिल्ह्याच्या प्राचीन इतिहासाचा शोध घेतला असता तो सातवाहन कालखंडापर्यंत जावून पोहोचतो. त्यापुढील कालखंडात

राष्ट्रकुट, चालुक्य, वाकाटक, शिलाहार व देवगिरीचे यादव, गंग, हैदय्, कलचूरी या प्राचीन राजघराण्यांनी राज्यकारभार केलेला होता. या राजघराण्यातील राजकर्त्यांनी अनेक देणग्या व दान दिलेली होती आणि ती प्रामुख्याने ताम्रपट व शिलालेख च्या स्वरुपात होती.

सांगली जिल्ह्यामध्ये प्राचीन राजघराण्यातील राजांनी दिलेल्या दानाची माहिती शिलालेखामधून मिळते. सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील उमराणी येथेप्राचीन शिलालेख सापडला आहे. या प्राचीन शिलालेखामध्ये हेगेश्वर मंदिराच्या दुरुस्तीसाठी १२ जून १९७३ रोजी कलचुरी घराण्यातील राजा नृपती भुजबल महादेव (बिजल) यांन`दिलेल्या देणगीचा उल्लेख आहे. इतिहास काळात उमराणी गावजवळच आदिलशाही सरदार बहलोलखान आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे सरसेनापती प्रतापराव गुजर यांच्यात इतिहास प्रसिध्द लढाई झाली होती.

सांगली जिल्ह्याच्या सिमेलगतच कराड हे प्राचीन गाव आहे. दक्षिण भारतात सापडलेल्या अनेक शिलालेखामध्ये व ताम्रपटामध्ये कराड चा उल्लेख करहाटक किंवा करहाट असा केलेला आहे. प्राचीन राजे शिलाहार व करहाटक प्रांतातून अनेक गावाच्या प्रदेशावर राज्य कारभार करीत होते. करहाटक प्रांत (कराड) आणि मिरिज किंवा मिरिच देश(मिरज) या गावाचेउल्लेख प्राचीन शिलालेखात सापडलेलेआहेत.

महाराष्ट्रातील ब्रह्मपुरी (कोल्हापूर), प्रतिष्ठान (पैठण), कर्नाटक (कल्याणी ऐहोळे) व तबार (उस्मानाबाद) या ठिकाणी अनेक शिलालेख , ताम्रपट व नाणी सापडलेली आहेत.त्या संदर्भसाधनामध्येकरहाटक व मिरिंच देश या दोन्ही गावाचा प्राचीन उल्लेख आढळून आलेला आहे. प्राचीन कालखंडातील राजघराण्यातील चालुक्य, वाकाटक, शिलाहार व यादव राजकर्त्यांनी संक्रात व सुर्यग्रहणाच्या वेळी विविध दाने दिलेली होती. प्राचीन काळातील विविध राजे त्यांनी दिलेल्या देणग्या दाने व दिग्विजय याची माहिती शिलालेख व ताम्रपटामधून मिळते. तसेच प्राचीन इतिहास, भौगोलिक क्षेत्र, सामाजिक स्थिती , आर्थिक स्थिती या महत्वाच्या गोष्टीवर प्रकाश पडतो.

शिलाहार सम्राट गण्डरादित्य यांनी इ.स.१११० ते ११४० या आपल्या राजकीय कारकीर्दीमध्ये मिरज प्रांतात गण्डसमुद्र नावाचा अतिविशाल तलाव बांधलेला होता. याचा उल्लेख शिलालेखात सापडतो.

सांगली जिल्ह्यातील मिरज येथील शिलालेखा प्रमाणेच एरंडोली (प्राचीन नाव एरडवली किंवा एराडावली) कवलापूर (प्राचीन नाव कावलापूर) आणि मालगाव (प्राचीन नाव दुग्धग्राम) आणि खोची (प्राचीन नाव कोची) या गावाच्या नावाचे संदर्भ सापडतात. राष्ट्रकुट राजघराण्यातील राष्ट्रकुट सम्राट गोविंदराज (पाचवा) यांच्या कारकिर्दीतील संस्कृत भाषेत लिहिलेला ताम्रपट सांगली येथे सापडला आहे. या ताम्रपटामध्ये उल्लेख असलेले लोहग्राम हे गाव पुणे जिल्ह्यातील लोहगांव असावे असा काढता येतो.

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील भाळवणी येथेप्राचीन राजघराणे शिलाहार यांच्या कारकिर्दीतील कन्नड भाषेतील शिलालेख सापडला आहे. या शिलालेखावरुन भाळवणी गावामध्ये गवरेश्वराचे प्राचीन व प्रसिध्द मंदिराची माहिती मिळते. खानापूर तालुक्यातील शिवनगे (आजचेशिवणी) या गावाचा उल्लेख शिलाहार राजाच्या शिलालेखात आहे. शिलाहार राजे इ.स.च्या १३ व्या शतकात करहाटक प्रांतातून राज्यकारभार करीत होते. त्यावेळी करहाटक (कऱ्हाड) प्रांताचे भाळवणी हे राजधानीचे ठिकाण होते. भाळवणी गावामधून चार हजार गावाचा राज्यकारभार चालत होता असे उल्लेख शिलालेखामधून स्पष्ट होतात. भाळवणी या गावामध्ये तो गरहूस या नावाची बाजारपेठ होती. तसेच गावाच्या गरजा भागवणाऱ्या १२ बलुतेदाराचा उल्लेख भाळवणी येथे सापडलेल्या शिलालेखात आहे[५].

अलीकडील काळात आपण जमिन मोजण्यासाठी हेक्टर, एकर व गुंठा अशी परिमाणे वापरतो त्या पुर्वीच्या कालखंडात चाहूर, वावर किंवा वाकूर ह्या परिमाणामध्ये जमिनीची मोजणी केली जात होती. प्राचीन कालखंडात जमिन मोजणी करण्यासाठी दंड, हल, कम्म किंवा मतर ही परिमाणे वापरली जात. सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील भाळवणी येथे सापडलेल्या शिलाहार राज्याच्या कन्नड शिला लेखामध्ये२०० कम्म जमिन मंदिरासाठी दान दिल्याचे उल्लेख आहेत.

सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील नरसिंहपूर हेगाव प्राचीन मंदिराबद्दल प्रसिध्द आहे. कृष्णा नदीच्या तीरावर बांधलेलेनरसिंह मंदिर वास्तूकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. नरसिंह मंदिराच्या विशिष्ट वास्तूकलेची माहिती कृष्णा व समुद्रेश्वर महात्मातून स्पष्ट होते. प्राचिन राजघराण्यातील सत्तेश्वर राजाने (सत्यात्रय पुलकेशी) याने कुंडल गावाशेजारी असणाऱ्या पर्वतावर सागरेश्वर मंदिर बांधलेले आहे. सत्येश्वर राजाच्या कारकिर्दीची माहिती समुद्रेश्वर माहात्म्यात उल्लेख केली आहे.

सांगली जिल्ह्यातील वाटेगांव चा उल्लेख प्राचिन काळात वटारग्राम असा केलेला होता. या वाटेगाव गावामध्ये वटेश्वराचे(वाटेश्वराचे) प्राचीन मंदिर आहे. या प्राचिन मंदिरात, चांगदेव महाराजाची मुर्ती आहे. सातवाहन सम्राट शिवश्री पुलूमली हा इ.स.१४८ मध्ये सातवाहन गादीवर राज्यकारभार करीत होता. हा शिवश्री पुलूमवि हा महापराक्रमी सातवाहन सम्राट गौतमीपुत्र सातकर्णी याचा पुत्र होता. सातवाहक सम्राट वसिष्टीपुत्र शिवश्री पुलुमवि व स्कंद सातकर्णी यांच्या कारकिर्दीतील वाटेगांव (जि.सांगली), ब्रह्मपुरी(जि.चंद्रपूर), तऱ्हाळा (जि.अकोला) या तीन ठिकाणी शिशाची नाणी सापडली आहेत. त्यामुळेसांगली जिल्ह्याच्या प्राचीन इतिहासाची माहिती शिलालेखावरुन स्पष्ट होते.

सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्या मधील बोरगांव येथेप्राचीन शिलालेख सापडलेला आहे. तसेच कवठेमहांकाळ तालुक्यातील कोंगनाळी येथे भगवान महावीर यांची प्राचीन मुर्ती सापडली आहे.

**कवठेमहांकाळ तालुक्यातील बोरगांव येथील प्राचीन शिलालेख –**

सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्या मधील बोरगांव येथे चालुक्य घराण्याच्या कारकिर्दीतील प्राचीन शिलालेख सापडला आहे. चालुक्य सम्राट चालुक्य प्रताप चक्रवर्ती गहेकमल्ल यांच्या राज्यरोहणाच्या तपपुर्ती निमित्त बोरगावातील (प्राचीन नाव बोरीग्राम किंवा बोरीगाव) मंदिराला दिलेला दानाचा व देणग्याचा उल्लेख प्राचीन शिलालेखात आहे. चालुक्य राजानेहेदान २० फेब्रुवारी ११५० रोजी दिलेले होते असे स्पष्ट केले आहे[७].

बोरगांव येथे सापडलेल्या शिलालेखामध्ये फुलाच्या बगीच्याचा उल्लेख सापडतो. बोरगांव येथील शिलालेखानुसार कापसाच्या गासाड्या, मीठ, विड्याची पाने, सुपाऱ्या भात या वरील कर, घोड्याच्या विक्रीवरील कराचा वाटा, एक तेलघाणा, एक पान दुकान व शेतातील एक घर यांच्या तील वाटा देवस्थानला देण्याची व्यवस्था केलेली होती.

कवठेमहांकाळ तालुक्यातील बोरगांव व देशिंग परिसरामध्ये घोड्यांचा बाजार मोठ्या प्रमाणावर भरवला जात होता. या बाजारातील घोड्याच्या खरेदी विक्रीवरील कर देवस्थानला देण्याचा स्पष्ट उल्लेख शिलालेखामध्ये आहे. कवठेमहांकाळ तालुक्यातील देशिंग येथे आजही बैलगाड्याच्या शर्यती प्रसिध्द आहेत. त्यामुळे प्राचीन काळ या ठिकाणी अश्व शर्यती होत होत्या असेअनुमान काढता येते.

बोरगांव येथील शिलालेखावरुन पार्श्वनाथ मंदिरासाठी बाजारात विक्रीस येणाऱ्या कापसाच्या गासाड्यातील कापूस तेलाच्या बुधल्यातील डावभर तेल, पानाच्या टोपलीतील खाऊची पाने देण्याचे स्पष्ट आदेश

दिलेले होते.

सर्व धर्मिय मंदिरात अखंड दिवा तेवत ठेवणे याला विशेष महत्व आहे. मंदिरामध्ये त्रिकाल धुपारती, पंचामृत, दिव्याची वात, अखंड नंदादिप, फुलेव दोन वेळच्या नैवेद्य यासाठी मोठ्या प्रमाणांत राज्यकर्त्यांकडून दान दिल्याचे उल्लेख सापडतात. सांगली जिल्ह्यामध्ये सुमारे ८०० वर्षापूर्वी सापडलेल्या शिलालेखामध्ये गावातील मंदिरासाठी जमिन आणि त्यालगतच देवदाशीसाठी एक घर दान दिल्याचे उल्लेख सापडतात. सांगली जिल्ह्यातील बोरगांव येथील पार्श्वनाथ मंदिरासाठी तेलाचा एक घाणाच व देवासमोरच्या दिव्यासाठी ठराविक मापे तेल देण्याचे बंधन चालुक्य राजाच्या राज आज्ञेत होते[८]. बोरगांव येथील शिलालेखावरुन तत्कालीन धार्मिक स्थितीवर प्रकाश पडतो.

कवठेमहांकाळ तालुक्यातील कोंगनाळी येथील प्राचीन भगवान महावीर यांची मूर्ती सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्यातील कोंगनोळी येथे४० वर्षापूर्वीची पार्श्वनाथ तिर्थकराची मुर्ती सापडली आहे[९]. अकराव्या शतकात प्रतिष्ठापित झालेली व कांही कारणाने जमिनीत गाढली गेलेली पार्श्वनाथची मुर्ती १९६६ मध्ये कोगनाळी येथील उत्खननात सापडली आहे. कोंगनाळी येथील भुईकोट किल्ल्यामध्ये भुगर्भात सापडलेल्या श्री पार्श्वनाथ तिर्थकराच्या मुर्तीच्या ठिकाणीच एकूण ६ एकर परिसरात हेमाडपंथीय पध्दतीचे मंदिर बांधकाम सुरु आहे[१०].

कवठेमहांकाळ तालुक्यातील कोंगनाळी येथे सापडलेल्या भगवान महावीर यांच्या मुर्तीच्या चरणाखाली ''श्री मुलसंघ देशिय गण पुस्तक गच्छ कोडकुदान्वय इंगळेश्वर बळी सामंत बसदि प्रतिष्ठे.''

असा हळी हळी कानडी भाषेतील शिलालेख सापडला आहे. या प्राचीन शिलालेखावरुन ही मुर्ती इ.स. ११ व्या शतकात प्रतिष्ठापित झाल्याचे स्पष्ट होते. कोंगनाळी येथे श्री १००८ पार्श्वनाथ तिर्थकर जीन मंदिर ३ गर्भग्रह उभारणीचे काम सुरु आहे. या गर्भ मंदिराच्या प्रवेशद्ारावर सौधर्म इंद्र व ईशान्य इंद्र दोन्ही बाजूने आकाशगामिनी विद्येनेभगवंतावर अभिषेक करण्याकरिता क्षीर सागरातील जल नेत आहेत असा जन्माभिषेक सोहळ्याचे दृश्य प्रवेशद्वारावर चित्रित केलेले आहे[११].

सांगली जिल्ह्यामध्ये सापडलेल्या विविध शिलालेख, ताम्रपट व विविध मुर्तीच्या चरणाखालील शिलालेख यामुळे प्राचीन इतिहासाची माहिती, तत्कालीन सामाजिक , आर्थिक व धार्मिक प्रकाश टाकता येतो.

**संदर्भ:-**


- हॉस्कीन्स डब्लयू जी. लोकल हिस्ट्री ऑफ इंग्लंड १९५९,पृष्ठ क्र. ६
- गॅझेटियर ऑफ इंडिया महाराष्ट्र स्टेट , सांगली डिस्ट्रीक्ट १९६९, पृष्ठ क्र. ०१
- जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ ,महाराष्ट्र राज्य , सांगली जिल्हा, १९९१, पृष्ठ क्र. १२९
- गॅझेटियर ऑफ इंडिया महाराष्ट्र स्टेट , सांगली डिस्ट्रीक्ट १९६९, पृष्ठ क्र. ०१
- दैनिक सकाळ सांगली आवृत्ती दि. १९/०३/२००६, पृष्ठ क्र. ०१
- दैनिक सकाळ सांगली आवृत्ती दि. ०९/०४/२००६, पृष्ठ क्र. ०१
- दैनिक सकाळ सांगली आवृत्ती दि. १९/०३/२००६, पृष्ठ क्र. ०१
- दैनिक सकाळ सांगली आवृत्ती दि. ०९/०४/२००६, पृष्ठ क्र. ०१
- दैनिक तरुण भारत, सांगली, आवृत्ती दि. २४/०३/२००६, पृष्ठ क्र. ०३
- दैनिक पुढारी सांगली आवृत्ती दि. १५/०५/२०१०, पृष्ठ क्र. ०८
- दैनिक सकाळ सांगली आवृत्ती दि. १३/०४/२०१०, पृष्ठ क्र. ०२